Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

# अध्यापक भूमिका

**प्रा.के.एस. खैरनार,**
**शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक**

**प्राचार्य डॉ.डी.एस. सूर्यवंशी,**
**आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर.**

**प्रास्ताविक :**

शिक्षण प्रक्रियेमध्ये शाळा ही महत्त्वपूर्ण असते. शाळेमध्ये खरा कार्यकर्ता शिक्षक असतो. शिक्षक ज्या उत्साहाने आपल्या कार्याला सुरुवात करील, विद्यार्थ्यामध्ये ज्या हेतूने चैतन्य निर्माण करील त्या प्रमाणात त्याला यश मिळत असते. अध्यापन करतांना विद्यार्थ्यांचा होणारा विकास स्वत:च्या डोळ्यांनी पाहण्याचे समाधान शिक्षकांना मिळत असते. अध्यापन प्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे ते दुसऱ्यासाठी केले जाते स्वत:साठी केले जात नाही.

शिक्षणातील तीन महत्त्वूपर्ण बिंदू म्हणजे शिक्षक, विद्यार्थी आणि विषय होय. अध्यापन प्रक्रियेत या तीनही बिंदूमध्ये योग्य समन्वय साधला जातो. अध्यापन या संकल्पनेतून शिक्षकाची सक्रिय भूमिका दिसून येते. शिक्षक अध्ययनाला प्रवृत्त करतो, मार्ग दाखवितो, वळण लावतो, प्रोत्साहन देतो. थोडक्यात शिक्षक अध्यापन प्रक्रियेतून विद्यार्थ्यांच्या वर्तनात योग्य परिवर्तन घडवून आणत असतो.

शिक्षकाने अध्यापन करतांना स्वत:च्या अध्ययनाकडे प्रथम लक्ष देणे योग्य ठरते. अध्ययन अध्यापन या दोन्ही प्रक्रिया परस्परपूरक स्वरुपाच्या आहेत. अध्यापनाशिवाय अध्ययन होत नाही आणि अध्ययन होत नसेल तर त्याला अध्यापन म्हणता येणार नाही. अध्ययनाची परिणामकारकता वाढविण्यासाठी अध्यापन परिणामकारक होणे आवश्यक असते. यामुळे अध्यापन प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका उठून दिसते.

शिक्षकी पेशासंबंधी विचार करतांना काही प्रश्न नेहमी विचारले जातात. शिक्षकाच्या अंगी कोणकोणते गुण असावेत? प्रभावी शिक्षक कोण? शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व कसे पाहिजे? शिक्षकाची भूमिका कोणती? या संदर्भात शिक्षकाचा आपल्या दैनंदिन कामात ज्याच्यांशी संबंध येतो, ज्यांच्याबरोबर सतत आतंरक्रिया चालू असते त्या विद्यार्थ्याला शिक्षक कसा दिसतो हे अधिक महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांना आपल्याबद्दल काय वाटते? हा विचार शिक्षकांनी सातत्याने केला तर आपली भूमिका नेमकी कोणती आहे ती भूमिका प्रभावीपणे पार पाडण्यासाठी स्वत: मधील गुणांचा शोध शिक्षकाला घ्यावा लागेल.

**अध्यापकाची विविधांगी भूमिका :**

**सुलभकः**

सुलभ या शब्दाचा सरळ अर्थ सोपे असा आहे. विद्यार्थ्यांना अध्ययन सुलभ व्हावे यासाठी शिक्षक योग्य अध्यापन पध्दती, अध्यापन तंत्रे, विविध प्रकारच्या शैक्षणिक अनुभूतींचा वापर करीत असतात. साधारणपणे अध्ययनाची सुलभता ही अनेक घटकांवर अवलंबुन असते. त्यामध्ये आशय, अध्यापन पध्दती, अभिरुची, प्रेरणा, अवधान, बौध्दिक क्षमता हे घटक महत्त्वाचे ठरतात. शिक्षक आपल्या अध्यापनातून विविध संबोध, संकल्पना उदाहरण दाखले व स्पष्टीकरण याद्वारे आशयाचे विवेचन करतात. विद्यार्थ्यांना आशयाचे आकलन होण्यासाठी शिक्षक सुलभकाची भूमिका पार पाडतांना दिसतात. शिक्षकांच्या या कार्यामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन सुकर व परिणामकारक होते.

**प्रेरक :**

प्रत्येक प्राणीमात्रांच्या अध्ययनासाठी प्रेरक शक्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रेरकशक्ती शिक्षकांकडून वारंवार मिळाली पाहिजे. साधारणपणे प्रेरणा ही अध्ययनकर्त्यांच्या गरजेतून निर्माण होत असते. शिक्षकांनी अध्ययनकर्त्याच्या गरजा ओळखून त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

उदा. बी.एड्. पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याला चांगले शिक्षक व्हावयाचे आहे. यासाठी अध्यापनाची विविध कौशल्ये त्याबरोबरच अध्यापन पध्दती आत्मसात करण्यासाठी शिक्षकाने प्रेरकाची भूमिका पार पाडणे महत्त्वाचे ठरेल. अर्थात विद्यार्थ्यांची अभ्यासाची चिकाटी महत्त्वपूर्ण राहिल यामधून चांगले यश संपादन करता येईल. शिक्षक हा स्फूर्तीदायक हवा. शिक्षकाने सातत्याने अध्ययनाला प्रोत्साहन दिले पाहिजे. नव-नवीन कृती करण्यास प्रेरणा दिली पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर नेहमी प्रेरक ठेवावा त्यामधुन प्रेरणा मिळेल.

**विमर्शक :**

आज ज्ञानाच्या कक्षा सातत्याने रुंदावत चालल्या आहेत. ज्ञानाची वाढणारी सखोलता, व्यापकता लक्षात घेता शिक्षकाने विमर्शकाची भूमिका बजावणे आवश्यक आहे. अध्यापनातून दिले जाणारे ज्ञान जास्तीत जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांपर्यंत गेले पाहिजे. शिक्षकाने विमर्शकाची भूमिका बजावंताना स्वत: बरोबरच विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक क्षमतेची निर्मिती करणे योग्य ठरेल.

शिक्षक हा ज्ञानाच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या नेहमी पुढे असणे आवश्यक आहे. आपल्या विषयासंदर्भातील अद्ययावत व सखोल ज्ञान त्याच्या जवळ असणे योग्य ठरेल. शिक्षक हा आदर्शाकडे जाणारा हवा जेणे करुन विद्यार्थी देखील विविध गुणांची जोपासना करेल.

**समुपदेशक :**

विविध विषयामध्ये ज्ञानाचा विस्तार झपाट्याने होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये ही जीवघेणी स्पर्धा वाढतांना दिसून येते. आपल्या भावी आयुष्याचा विचार करतांना, विषयाची निवड करतांना, शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षकांचा सल्ला घेणे महत्त्वाचे वाटते. उदा. अभ्यास कसा करावा? स्मरण सुलभ पध्दती कोणती ? या संदर्भात शिक्षक समुपदेशकाची भूमिका यशस्वीरित्या पार पाडू शकतात. समूपदेशकाच्या भूमिकेमुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन चांगले होते. विद्यार्थ्यांना असणाऱ्या विविध शैक्षणिक समस्याचे निरसन शिक्षक समुपदेशकाच्या भूमिकेतून करु शकतात. कारण समुपदेशकाची भूमिका बजावतांना विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा, अभिवृत्ती, क्षमता याची जाणीव करुन दिली पाहिजे. त्याबरोबर शैक्षणिक व व्यावसायिक निवडी संदर्भात मदत करणे योग्य ठरेल.

**मित्र :**

स्वत:चे आयुष्य सुखी व यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाला मित्राची गरज असते. आपले जीवन सुखी व यशस्वी करण्यासाठी योग्यवेळी योग्य निर्णय घेणे आवश्यक ठरते. अशा प्रसंगी शिक्षक एक मित्र म्हणून प्रभावी कार्य करु शकतो. बालकांच्या वाढ व विकासात मित्रत्वाची भावना प्रभावी ठरते. बालकांच्या सर्वांगिण विकास प्रक्रियेत त्याचे मित्र कसे आहेत, किती मित्र आहेत, कोणते मित्र आहेत हे महत्त्वाचे ठरते. शिक्षकाला विद्यार्थ्यांशी नि:स्वार्थीवृत्ती ठेवून मैत्री जोपासता आली पाहिजे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या योग्य विचाराशी, मताशी जुळवून घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांबरोबर खिलाडूवृत्ती, सहकार्य, सहिष्णुता, आत्मविश्वास, साहसीवृत्ती यासारख्या गुणांची जोपासना शिक्षकांनी केली पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षक आपला जवळचा मित्र आहे ही भावना निर्माण झाली पाहिजे. मित्रत्व या भावनेतून दोघांमध्ये आंतरक्रिया होणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांना असलेल्या विविध प्रकारच्या अडचणी, समस्या सोडविण्यासाठी एक मित्र म्हणून शिक्षकाने भूमिका पार पाडणे आवश्यक ठरेल.

**मार्गदर्शक :**

मार्गदर्शन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. मार्गदर्शनामुळे व्यक्तीला आपल्या कुवतीचा अंदाज घेऊन विकास साधता येतो. शालेय जीवनात उद्‌भवणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शनाची मदत आवश्यक ठरते. साधारणपणे विद्यार्थ्यांच्या अंगच्या गुणांचा सर्वदृष्टीने विकास व्हावा म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांला मार्गदर्शन मिळाले पाहिजे.

आज विद्यार्थ्यांसमोर विविध प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. पालकांच्या अपेक्षा, कुटूंबातील मतभेद, कुटूंबाची आर्थिक स्थिती, महागाई, अभ्यासाचा वाढता ताण यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून मार्गदर्शन

मिळणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांच्या समायोजनासंबंधी व व्यक्तिमत्व विकासासंबंधी समस्या समजून घेऊन सोडविण्यास मदत केली पाहिजे. वर्गामध्ये, शाळेमध्ये आवश्यक तेथे मार्गदर्शन केले पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या अध्ययन विषयक समस्या जाणून घेवून त्याप्रमाणे उपचारात्मक अध्यापन करणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांमधील व्यक्तिभिन्नता लक्षात घेऊन अपंग, मंद बुध्दी, मागास, कुशाग्र बुध्दीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे योग्य ठरेल. विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा? अभ्यासक्रम कोणता निवडावा? आपण कोणत्या क्षेत्रात यशस्वी होऊ ? या बाबतीत शिक्षकांचे मार्गदर्शन नक्कीच यशस्वी ठरेल. साधारणपणे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक, व्यावसायिक, व्यक्तिगत स्वरुपाचे मार्गदर्शन केले पाहिजे.

**समंत्रक :**

विद्यार्थी अध्ययन करीत असतांना त्याला विविध प्रकारच्या समस्या, अडचणी निर्माण होत असतात. या समस्या योग्यवेळी सोडविणे आवश्यक असते. शिक्षकांनी वर्गात अध्ययन विषयासंबंधी असलेल्या शंकाचे निरसन करणे गरजेचे आहे. अशा प्रसंगी शिक्षकाला समंत्रकाची भूमिका पार पाडावी लागते. समंत्रणाच्या तासिकेला विद्यार्थ्यांच्या आशयासंदर्भात असलेल्या शंकावर चर्चा करणे अभिप्रेत असते.

**मदतनिस :**

वाढत्या वयाबरोबरच विद्यार्थ्यांचा विकास होत असतो. त्याचबरोबर अनेक अडचणी निर्माण होत असतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक स्वरुपाच्या समस्या असतात. समस्या सोडविण्यासाठी त्यांना इतरांची मदत हवी असते. अशा प्रसंगी निर्माण झालेल्या समस्या निराकरणासाठी शिक्षकांची मदत होत असते. विद्यार्थी निर्माण झालेल्या समस्या, अडचणीवर मात करीत असतो. अशा प्रसंगी शिक्षक विद्यार्थ्याला समस्या सोडविण्यासाठी मदत करीत असतात म्हणून शिक्षकांना विद्यार्थ्यांचा मदतनिस म्हणूनही संबोधले जाते.

**बदलत्या भूमिका :**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकांची भूमिका महत्तवूपर्ण ठरते. वर्गातील अध्यापनाबरोबरच शिक्षकांना विविध स्वरुपाच्या भूमिका करणे सहज शक्य आहे. सद्याच्या धावपळीच्या काळात विद्यार्थ्यांवर विविध प्रकारचा ताण निर्माण होत असतो. हा ताण शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक अशा स्वरुपाचा असू शकतो. अशावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्याच्या समस्येवर योग्य उपाय सुचविला पाहिजे. याप्रसंगी घरातील-वडिलांची भेट घेऊन विद्यार्थ्यांना आधार दिला पाहिजे. शिक्षकांच्या आधारामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणीत होत असतो. म्हणून शिक्षकांनी अध्यापन कार्याबरोबरच अभ्यासपूरक स्वरुपाच्या भूमिका यशस्वीरित्या पार पाडल्या पाहिजेत.

**सर्वसमावेशक भूमिका :**

शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांना सर्वसमावेशक भूमिका सहजतेने वाढविता आली पाहिजे. शिक्षणाच्या असलेल्या वेगवेगळ्या संधी वेगवेगळ्या मार्गाने, वेगवेगळ्या पध्दतीने उपलब्ध करुन देणे गरजेचे ठरेल. शिक्षकाने सर्वसमावेशक भूमिका पार पाडतांना शिक्षण प्रवाहात सर्वांचा समावेश कसा करता येईल याला महत्त्व दिले पाहिजे. सर्वांना सहभागी करुन घेणारे शिक्षण असा व्यापक दृष्टीकोन ठेवला पाहिजे. सर्वांना सहभागी करुन आपल्या वर्गातील विशेष शैक्षणिक गरजा असणारी मुले, अंपग मुले यांच्या शिक्षणालाही महत्त्व दिले पाहिजे.

शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन प्रसंगी अध्यापनात लवचिकता ठेवून सर्वांना अध्यापन प्रक्रियेत सहभागी करुन घेतले पाहिजे. यासाठी विविध अध्ययन साहित्याचा गरजेनुसार वापर केला पाहिजे. थोडक्यात शिक्षकांच्या अंगी सर्व प्रकारच्या मुलांना शिकविण्याचे अध्यापन कौशल्य या भूमिकेमुळे प्राप्त होत असते.

**एकात्म भूमिका :**

शिक्षणाची प्रक्रिया विविध घटकांशी संबंधित असते. विद्यार्थ्यांमध्ये विविध स्तरांवर साकार होणाऱ्या विविध लक्षणांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध निर्माण होत असतो. विद्यार्थ्यांच्या या कार्यात सुसंगती असले, सातत्य असेल तर शिक्षकांना सुध्दा एकात्म भूमिका सहजतेने साधता येईल.

शिक्षकाच्या एकात्म भूमिकेत विद्यार्थ्यांच्या असलेल्या विविध गरजा विद्यार्थ्यांची कार्यक्षमता आणि निश्चित केलेली उद्दिष्टे यामध्ये योग्य समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो.

विद्यार्थ्यांच्या गरजा, आशा आकांक्षा, अभिरुची, अभिवृत्ती, मूल्ये, कार्यक्षमता यामध्ये योग्य सुसंवाद साधल्यास शिक्षकाची एकात्म भूमिका यशस्वी ठरेल यात शंका नाही. शिक्षकाच्या एकात्म भूमिकेमुळे इष्ट बदल घडून येण्यास मदत होते. विद्यार्थ्यांच्या क्षमता अधिक विकसित होऊन त्यांना सामाजिक जीवनाची ओळख करुन देता येते. थोडक्यात शिक्षकांच्या एकात्म भूमिकेमुळे विद्यार्थ्यांचा परस्परपूरक व समतोल विकास साधला जातो.

**संदर्भ ग्रंथ:**

1) पारसनीस न.रा., **प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र,** नूतन प्रकाशन, पुणे (1996).
2) दांडेकर वा.ना., **शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र,** मोघे प्रकाशन, कोल्हापूर (1988).

3) करंदीकर सुरेश, **शैक्षणिक मानसशास्त्र,** फडके प्रकाशन, कोल्हापूर (2005).

4) खरात आ.पा., **प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र,** विद्या प्रकाशन, पुणे (1982).

5) Baron, R.A., Byrne, D and Kantowitz (1980) **Psychology : Understanding behaviour,** New York, Holt Rinehart and Winston Inc.

6) Hargreaves D.H., (1975), **Interpersonal Relations and Education,** Londoan : Routlege and Kegan Paul Ltd.